**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. – ५</u>** **<u>नि.फौ.ख.क्र.२३/२०११</u>**

**सरकार विरुध्द सुधीर**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – २४**

**माझे नांव – भास्कर तुकाराम हिरूळकर**
**वय – अंदाजे ६५ वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त पोलीस**
**राहणार – काटोल.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जी.ओ. वर्मा यांच्या कडून –**

दि.१२.०२.२०११ रोजी मी कामठी पोलीस ठाण्यात ए.एस.आय. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी माझ्याकडे चंद्रकला बाई रिपोर्ट देण्याकरीता आल्या होत्या. त्यांनी मला त्यांना व त्यांच्या मुलाला मारपीट झाल्याचे सांगितले. मी त्यांची रिपोर्ट नोंदवून घेतली होती. मला आता निशाणी २१ कडील रिपोर्ट दाखविला, ती तीच आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर चंद्रकला बाई यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे व तो खरा व बरोबर आहे. आता मला छापली फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे, तो बरोबर आहे. त्यावर फिर्यादीची सही आहे. गुन्हयाच्या तपास ए.एस.आय.तिवारी यांनी केला.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. रामटेके यांच्या मार्फत सुरु –**

हे म्हणणे खरे नाही की निशाणी २१ व २२ मधील मजकूर मी माझ्या मनाप्रमाणे लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी चंद्रकला हिला लिहीता व वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की ती फक्त सही करते. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीला लिहीता वाचता येत नाही याचा फायदा घेउन मी मनाप्रमाणे निशाणी २१ व २२ मधील मजकूर लिहीला. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपासणी नाही**.

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.03.18 17:42:09 +0530

कामठी ( मोहन रा. कामत )
दिनांक १८/०३/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी